१. मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय क्रमांक-२, सांगली यांनी दावा क्रमांक ५४/२०१५ मध्ये दि.०४/०१/२०१८ रोजी दिलेला निकाल.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(१)

1570

---

जा.क्र.सनिक/कक्ष-२/का.क.७७ अ/रांजणी ग्राहक/२०१८ ६४४

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कवठेमहांकाळ यांचे

कार्यालय, कवठेमहांकाळ दि.२८/०२/२०१८

**प्रस्तावना:-**

ज्या अर्थी, रांजणी ग्राहक सहकारी संस्था मर्या, रांजणी, ता. कवठेमहांकाळ जि. सांगली ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदी अन्वये, नोंदविणेत आलेली सहकारी संस्था असून तिचे कार्यक्षेत्र रांजणी गावापुरते मर्यादित आहे. सदर संस्था या कार्यालयाचे कार्यकक्षेत येते. सदर संस्थेचे दैनंदिन कामकाज अधिनियम, नियम व उपविधीतील तरतूदी अन्वये चालणे अपेक्षित आहे.

ज्या अर्थी, उपरोक्त संस्थेच्या संचालक मंडळाची सन २०१४-१५ ते २०१९-२० या मुदतीसाठी निवडणूक या कार्यालयाने नियुक्त केलेल्या निवडणूक निर्णय अधिका-यामार्फत घेणेत आलेली होती. सदर निवडणूकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी झालेल्या निवडणूकीस मा. सहकार न्यायालय क्रमांक-२, सांगली येथे आव्हान दिले होते. सदर दाव्याचा नंबर ५४/२०१५ असा आहे. सदर दाव्याचे रितसर कामकाज चालून मा. न्यायालयाने सदर संस्थेची झालेली निवडणूक अवैध / रद्दबातल असल्याचा निर्णय वरील वाचले क्रमांक -१ अन्वये दिलेला आहे.

त्या अर्थी, मा. न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयानंतर सदर निवडणूक मा.न्यायालयाने अवैध/रद्दबातल ठरविली असलेने संस्थेचे कामकाज तात्पुरते सुरु करणेचे दृष्टीने सदर संस्थेवर प्रशासक नियुक्त करणेची आवश्यकता असलेची माझी खात्री झाली आहे. सदर प्रकरणी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) (ii) मधील परंतुकानुसार या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस संबंधिताना बजाविण्याची आवश्यकता नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश देणेत येत आहे.

**-:आदेश:-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, उर्मिला श्रीधर राजमाने, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कवठेमहांकाळ रांजणी ग्राहक सहकारी संस्था मर्या, रांजणी ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली या संस्थेच्या नवनिर्वाचित संचालकांची निवड मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय क्रमांक -२ सांगली यांनी अवैध / रद्दबातल ठरविलेने त्यांचे जागी प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री आर.आर. पाटील, उपलेखापरीक्षक, सहकारी संस्था, कवठेमहांकाळ यांची नियुक्ती करीत आहे. सदर आदेशाचा कालावधी संस्थेचा पदभार स्विकारलेपासून ६ महिने राहील.

सदरचा आदेश मी माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दि. २८/०२/२०१८ रोजी दिला असे.

स्थळ :- कवठेमहांकाळ

दिनांक:-२८/०२/२०१८

सही/-

(उर्मिला श्रीधर राजमाने)

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था, कवठेमहांकाळ

OFFICE OF THE ASST. REGISTRAR CO-OP. SOCIETIES, KAVATHEMAHANKAL — सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कवठेमहांकाळ

प्रति,

श्री आर.आर. पाटील, उपलेखापरीक्षक, सहकारी संस्था, कवठेमहांकाळ

त्यांना कळविणेत येते की, आपण संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा तात्काळ स्विकारुन कामकाज सुरु तसेच संस्थेच्या संचालक मंडळाची फेर निवडणूक घेणेची व्यवस्था करावी.

| जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांचे कार्यालय | | |
|---|---|---|
| आवक दिनांक 6 MAR 2018 | | |
| आवक नंबर ७०५४ | | |
| शाखा/कक्ष क-3 | | |
| कार्यासीन अधीक्षक | सहा. निबंधक | जिल्हा उपनिबंधक |

**प्रत माहितीसाठी :-**

१) चेअरमन/सचिव, रांजणी ग्राहक सहकारी संस्था मर्या, रांजणी ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली

२) शाखाधिकारी, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा- रांजणी

**प्रत माहितीसाठी सविनय सादर -**

१. मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली.

२. मा. जिल्हा विशेष लेखा परीक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था, सांगली

३. मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे

सहाय्यक निबंधक,

सहकारी संस्था, कवठेमहांकाळ

Scanned by CamScanner